# ३१व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी गायकवाड

**मुंबई–** अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्यावतीने आयोजित ३१व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. याबाबतची माहिती परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी दिली.

शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांचे विचार आत्मसात करून समता, बंधुता व एकात्मता ही मूल्ये केंद्रस्थानी ठेवून गेली ३५ वर्षे सामाजिक प्रबोधन व परिवर्तनासाठी गायकवाड कार्यरत आहेत. मराठे शूद्र, हिंदू की ब्राम्हणी, आरक्षण, शिवचरित्रातून रामदास व दादोजी कोंडदेव हटावो, संभाजी ब्रिगेड : एक अभ्यासफ, मराठा क्रांती मोर्चाफ यांसारख्या महत्त्वपूर्ण ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे. याशिवाय त्यांनी सामाजिक व ऐतिहासिक विषयांवर ३००० हून अधिक व्याख्याने दिली आहेत.

या संमेलनाचे आयोजन ९ व १० मे २०२५ रोजी कराड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार आहे. संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते होईल. ग्रंथदिंडी, उद्घाटन समारंभ, परिसंवाद, चर्चासत्र, कथाकथन, कविसंमेलन असे विविध कार्यक्रम संमेलनात होणार असून देशभरातून सुमारे ९०० साहित्यिक यामध्ये सहभागी होणार आहेत. याआधी हे संमेलन पुणे, मुंबई, नांदेड, उदगीर, तुळजापूर, लातूर, धाराशिव, वणी, रत्नागिरी, गोंदिया, शेवगाव, बारामती, मंठा, सोलापूर व छत्रपती संभाजीनगर येथे पार पडले आहे. नारायण सुर्वे, मंगेश पाडगांवकर, द. मा. मिराजदार, शिवाजी सावंत, सुरेश भट, केशव मेश्राम, विश्वास पाटील, सुवर्णा पवार, श्रीपाल सबनीस, गंगाधर पाणतावणे, जनार्दन वाघमारे, भास्कर चंदनशिव, मुरहरी केळे अशा मान्यवरांनी यापूर्वी संमेलनाध्यक्षपद भूषवले आहे.

संमेलनाच्या तयारीसाठी नुकतीच एक बैठक कराड येथे डॉ. शरद गोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सर्वानुमते प्रवीण गायकवाड यांची संमेलनाध्यक्षपदी निवड करण्यात आली. बैठकीस पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. नितीन नाळे, कोल्हापूर विभागीय अध्यक्ष विकास भोसले, सातारा जिल्हाध्यक्ष संदीप पवार, महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ. हनुमंत चिकणे, कार्याध्यक्ष विक्रम शिंदे, कराड तालुका अध्यक्ष डॉ. शंकरराव खापे, उपाध्यक्ष डॉ. दादाराम साळुंखे, सचिव प्रकाश पिसाळ तसेच किशोर पाटील, मानसिंग पाटील, वामन अवसरे, सुशील कांबळे, रामचंद्र पाटील, विजय कोळेकर, विद्या पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

# वानखेडेवर रोहित शर्माची दादागिरी; मुंबईच्या विजयाची हॅट्ट्रिक

**मुंबई–** आयपीएलमध्ये खराब सुरुवातीनंतर मुंबई इंडियन्स संघ पुनरागमन करण्यासाठी ओळखला जातो. या हंगामातही असेच काहीसे दिसून येत आहे. पहिल्या ५ सामन्यात फक्त १ विजय मिळवणाऱ्या मुंबईने आता विजयांची हॅट्ट्रिक केली. आयपीएल २०२५ चा २८ वा सामना मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवण्यात आला. या सामन्यात, हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सने सहज विजय मिळवला आणि सीएसकेविरुद्धच्या पराभवाचा बदला घेतला.



प्रथम फलंदाजी करताना चेन्नईची सुरुवात खूपच खराब झाली. रचिन रवींद्र पुन्हा एकदा अपेक्षा पूर्ण करू शकला नाही आणि ५ धावा करून आऊट झाला. यानंतर, पदार्पण करणारा आयुष म्हात्रे आणि शेख रशीद यांनी डावाची सूत्रे हाती घेतली आणि संघाची धावसंख्या ५० च्या पुढे नेली. म्हात्रे याने १५ चेंडूत ३२ धावा केल्या. संघाची तिसरी विकेट ६३ धावांवर शेख रशीदच्या रूपात पडली.

रवींद्र जडेजा चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि शिवम दुबेसोबत त्याने जबाबदारी सांभाळली. या दोघांनी चौथ्या विकेटसाठी ७९ धावांची मौल्यवान भागीदारी केली आणि चेन्नई २०० धावांचा टप्पा सहज पार करेल असे वाटत होते. पण दुबे (५०) आऊट झाल्यानंतर चेन्नईचा धावगती खूपच मंदावली. एमएस धोनीकडून काही फटके अपेक्षित होते, पण तो फक्त ४ धावा काढून आऊट झाला. जडेजाच्या मदतीने, सीएसकेने शेवटच्या पाच षटकांत ५८ धावा केल्या. अशाप्रकारे, सीएसकेने संपूर्ण षटक खेळले आणि ७ विकेट गमावून १७६ धावा केल्या.

जडेजाने ३५ चेंडूत ४ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद ५३ धावा केल्या. मुंबईकडून जसप्रीत बुमराह सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. ४ षटकांच्या स्पेलमध्ये फक्त २५ धावा देऊन २ महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. दरम्यान, दीपक चहर, अश्विनी कुमार आणि मिशेल सँटनर यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# हिंदी सक्तीवरून एक पाऊल मागे

## हिंदीऐवजी अन्य भारतीय भाषा शिकण्याचा पर्याय देण्याची मुख्यमंत्र्यांची भूमिका

**पुणे–** राज्यात मराठीचीच सक्ती आहे. हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे म्हणता येणार नाही. हिंदीऐवजी अन्य कोणतीही भाषा शिकायची असेल, तर तसा पर्याय विद्यार्थ्यांना दिला जाईल. त्याबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी येथे मांडली. त्यामुळे पहिलीपासून हिंदीसक्ती करण्याच्या निर्णयावर सरकारने एक पाऊल मागे घेण्याचे सूतोवाच केले आहे.

भारतीय विकास परिषदेच्या कार्यक्रमासाठी आले असताना, फडणवीस यांना हिंदीसक्ती मागे घ्यावी, याबाबत भाषा सल्लागार समितीने दिलेल्या पत्राबाबत पत्रकारांनी विचारणा केली. त्या वेळी त्यांनी ही भूमिका मांडली. इंग्रजी भाषेचे गोडवे गाताना हिंदीसारखी भारतीय भाषा लांबची का वाटते, याचाही विचार झाला पाहिजे, असा चिमटाही त्यांनी काढला.

मुख्यमंत्री म्हणाले, मराठीऐवजी हिंदी भाषा अनिवार्य केलेली नाही. नव्या शैक्षणिक धोरणात तीन भाषा अनिवार्य आहेत. त्यात दोन भारतीय भाषा आणि इंग्रजी असा नियम आहे. राज्यात मराठी सक्तीची आहे. दुसरी भाषा भारताबाहेरची घेता येणार नाही. मंत्र्यांच्या समितीनेही दुसरी भाषा हिंदी असावी, अशी शिफारस केली आहे. हिंदी विषयाचे शिक्षक उपलब्ध आहेत. अन्य भाषांसाठी पुरेसे शिक्षक नाहीत. त्यामुळेच ही शिफारस करण्यात आली होती. मल्याळम्, तमिळ, गुजराती किंवा अन्य दुसरी भाषा स्वीकारली असती, तर त्याचे शिक्षक उपलब्ध होणार नाहीत. मात्र, हिंदीऐवजी अन्य दुसरी भाषा शिकायची असेल, तर विद्यार्थ्यांना तशी संधी दिली जाईल. मात्र, त्यासाठी किमान २० विद्यार्थी असणे बंधनकारक असेल. तरच, त्यासाठी शिक्षक देता येतील. वीसपेक्षा कमी विद्यार्थी असतील, तर अन्य पर्यायांच्या माध्यमातून त्यांना भाषा शिक्षण देता येईल. त्याबाबतचा निर्णय लवकरच घेतला जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# नगरमध्ये ईस्टर सण आनंदात साजरा

## रेव्ह. तुपसुंदरे; येशूचे पुनरुत्थान मानवाच्या उद्धारासाठीच

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** प्रभु येशू ख्रिस्ताचे कृसावरील मरण व मरणावर विजयी होवून तिसऱ्या दिवशी पुन्हा जिवंत होणे म्हणजे येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थान. येशू ख्रिस्ताने मरणावर विजय मिळविला हे दैवी सत्य आहे. येशू ख्रिस्त आजही जिवंत आहे व तो संपूर्ण मानव जातीचे कल्याण करणार आहे. तेव्हा प्रत्येकाने जीवन पवित्र बायबलमध्ये दिलेल्या नितीतत्वाप्रमाणे जगणे आवश्यक आहे, असे विचार रेव्ह. अभिजीत तूपसुंदरे यांनी आपल्या भक्ती संदेशातून दिले.

अहमदनगर पहिली मंडळी चर्चमध्ये इस्टर संडेनिमित्त विशेष भक्तीचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन रेव्ह. राज कुमारी सिंग यांनी केले. सकाळी महिला मंडळाने सूर्योदयापूर्वीची उपासना चर्च परिसरामध्ये आयोजित केली होती. पहाटे सर्व महिला मंडळ एकत्र येऊन प्रभू उठला आहे, खरोखर उठला आहे, अशा घोषणा देऊन उपासना केली. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी चर्चचे सचिव सतिश मिसाळ, उपसचिव प्रितम जाधव, खजिनदार डॉ. संजय लाड, उपखजिनदार सॅम्युएल बोर्डे, कार्यक्रम समिती अध्यक्ष प्रसन्ना शिंदे, प्रा. विनीत गायकवाड, रविंद्र लोंढे, सुनित ढगे, अमोल लोंढे, कुमार हर्षल पाटोळे, शोभना गायकवाड, वंदना शिंदे, कांदबरी सुर्यवंशी, शशिकला साळुंके, स्नेहल साळवे यांनी परिश्रम घेतले.

# जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटी

**जम्मू–** जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही दिवसांपासून पाऊस पडत आहे. रविवारी सकाळी रामबन जिल्ह्यातील सेरी बागना भागात मोठ्या प्रमाणात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. तसेच वारा आणि गारपीट झाल्यामुळे तीन जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर येत आहे. अनेक ठिकाणी इमारती कोसळल्या आहेत. तसेच ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेकडो रहिवाशांना स्थलांतरित करण्यात आले आहे. मुसळधार पाऊस आणि वाऱ्यामुळे वाहतुकीलाही मोठा अडथळा निर्माण होत असल्याची माहिती सांगितली जात आहे.



रामबन जिल्ह्यात ढगफुटी आणि अचानक आलेल्या ढगफुटी सदृश्य पावसाच्या परिस्थितीमुळे परिस्थिती बिकट झाली आहे. दोन हॉटेल्स, काही दुकानं आणि काही घरांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. तसेच अनेक ठिकाणी भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आले आहेत. रामबनच्या उपायुक्तांनी द इंडियन एक्सप्रेसशी संवाद साधनाना सांगितलं की रात्री १.१० वाजता सुरू झालेला मुसळधार पाऊस दुपारपर्यंत सुरूच होता.

# शहापूर येथे आज यात्रा

**बालाजी देडगाव (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील शहापूर येथे श्री कालभैरवनाथ यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

आज सोमवार दि. २१ रोजी सकाळी ८.३०ते १० हजेरीचा कार्यक्रम, सायंकाळी ५ ते ६ कुस्त्याचा जंगी हंगामा व रात्री ८ ते ११ हमीद महाराज सय्यद यांचा एकनाथी भारुडाचा कार्यक्रम होणार आहे. परिसरातील भाविकांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन ग्रामस्थ व भजनी मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## बायोमेट्रिक प्रमाणीकरण लागू

झाल्यास, कार्मिक मंत्रालयाने गेल्या वर्षी २८ ऑगस्ट रोजी संघ लोक सेवा आयोगाद्वारे आधार-आधारित प्रमाणीकरणाला मंजुरी देण्यासाठी एक समान अधिसूचना जारी केली होती, जी कोणत्याही भरती संस्थेसाठी पहिलीच वेळ होती. एसएससी आणि यूपीएससीद्वारे देशभरात आयोजित सरकारी नोकऱ्यांच्या भरती परीक्षांमध्ये लाखो उमेदवार सहभागी होतात.

यूपीएससीने गेल्या वर्षीही त्यांच्या विविध चाचण्यांमध्ये फसवणूक आणि गैरप्रकार रोखण्यासाठी चेहऱ्याची ओळख आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित सीसीटीव्ही देखरेख प्रणालीचा वापर करण्याचा निर्णय घेतला होता. यूपीएससी दरवर्षी १४ प्रमुख परीक्षा आयोजित करते, ज्यात भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय विदेश सेवा आणि भारतीय पोलीस सेवा च्या अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी प्रतिष्ठित नागरी सेवा परीक्षेचा समावेश आहे. याशिवाय केंद्र सरकारच्या गट अफ आणि गट बफ पदांवर भरतीसाठी दरवर्षी अनेक भरती परीक्षा आणि मुलाखतीही होतात.

## कर्जत नगराध्यक्षपदासाठी आज अग्निपरीक्षा

यांची निवड करण्यात आली होती. उषा राऊत यांना अडीच वर्ष नगराध्यक्षपद व रोहिणी घुले यांना दीड वर्ष उपनगराध्यक्षपद असे समीकरण ठरले होते. अडीच वर्षाची मुदत संपल्यानंतर राज्यात सत्तांतर झाले आणि महायुती सरकारने राज्यातील सर्व नगरपंचायत व नगरपालिकांमध्ये विद्यमान नगराध्यक्षांना मुदतवाढ जाहीर केली. त्यानंतर उपनगराध्यक्ष रोहिणी घुले यांनी राजीनामा दिला नाही. मात्र, राऊत यांनी दोन्ही पदांचे राजीनामे एकत्रित घ्या अशी मागणी केली. मात्र, ती नगरसेवकांना योग्य वाटली नाही त्यामुळे १३ नगरसेवक ६ एप्रिलला सहलीला निघून गेले. ७ एप्रिलला त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे उषा राऊत यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला. १६ एप्रिलला या अविश्वास प्रस्तावावर प्रांताधिकाऱ्यांनी सुनावणी ठेवली होती. मात्र ती रद्द करण्यात आली. त्याचदिवशी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नगरसेवकांमध्ये बहुमत असल्यास तेच नगराध्यक्षांना पदावरून दूर करू शकतात असा निर्णय घेण्यात आला.

विशेष म्हणजे त्याचदिवशी राज्यपालांच्या सहीचा अध्यादेशही राज्यामध्ये लागू करण्यात आला. यावर आ. पवार यांनी विधान परिषदेचे सभापती शिंदे यांनी त्यांच्याकडे असणाऱ्या पदाचा गैरवापर करत, भारतीय जनता पक्ष केवळ सत्ता मिळवण्यासाठी कोणत्याही पातळीवर पुन्हा एकदा गेला आहे अशी जोरदार टीका केली होती. यामध्ये नगरसेवकांना पोलीस प्रशासनाचा दबाव, ठेकेदारांची बिले अडवणे, आर्थिक आमीश दाखवणे असे प्रकार केल्याचा आरोपही पवार यांनी आहे. या राजकीय नाट्यानंतर आज होणाऱ्या निर्णयाकडे राज्याचे लक्ष लागले आहे. नूतन अध्यादेशानूसार राज्यातील पहिलाच निकाल कर्जतमध्ये होणार का? हे आज स्पष्ट होणार आहे.

**चोख पोलीस बंदोबस्त**

सर्व राजकीय व इतर परिस्थितीचा विचार करता कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी अविश्वास प्रस्तावावरील विशेष सभेवेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नगर येथून अतिरिक्त पोलीस फोर्स, मागवण्यात आला आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक दौलतराव जाधव यांनी दिली.

## श्रीरामपूर भाजपा पदाधिकाऱ्यांच्या निवडी वादाच्या भोवऱ्यात!

प्रश्न माजी तालुका सरचिटणीस प्रफुल्ल डावरे यांच्यासह अन्य निष्ठावान भाजप कार्यकर्त्यांनी उपस्थित करत नाराजी व्यक्त केली. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी तुमचे जे म्हणणे असेल ते आम्हाला सांगा, ते आम्ही वरिष्ठांपर्यंत पोहच करू, असे आश्वासन देत कार्यकर्त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समोर ठेवून भाजपा पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. गेल्या दोन महिन्यापासून सदर निवडी करण्यासाठी प्रक्रीया सुरू होती. दि. २८ मार्च रोजी येथील शासकीय विश्रामगृह येथे इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यावेळी तालुक्यातील व शहरातील अनेक कार्यकर्त्यांनी मुलाखती देवून शहराध्यक्ष व तालुकाध्यक्ष पदासाठी आपलीच वर्णी लागणार? यासाठी मोर्चेबांधणी देखील केली होती. मुलाखतीनंतर तब्बल पंधरा दिवसानंतर निवडी जाहीर करण्यात आल्या. परंतु ज्यांनी मुलाखती दिल्या नव्हत्या, त्यांचीच नावे या पदासाठी जाहीर झाल्याने उपस्थित जुन्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप उसळला. अनेकांनी या निवडीला विरोध करत या निवडी नियमबाह्य असल्याचे सांगितले. या निवडी रद्द केल्या नाही तर आम्ही आत्मक्लेष आंदोलन करु, असा इशाराही दिला. परंतु उपस्थित पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना शांत करत तुमची मागणी वरिष्ठांपर्यंत कळवू, असे आश्वासन दिले. त्यामुळे भाजपा तालुकाध्यक्ष व शहराध्यक्ष पदाच्या झालेल्या निवडी वादाच्या भोवऱ्यात सापडल्याची चर्चा काल दिवसभर शहरात व तालुक्यात सुरू होती.

## मालेगाव बॉम्बस्फोट ८ मे रोजी निकाल

न्यायाधीश ए.के. लाहोटी यांनी निकालासाठी ८ मे ही तारीख निश्चित केली. खटल्यादरम्यान सरकारी वकिलांनी ३२३ साक्षीदारांची चौकशी केली, त्यापैकी ३४ जण आपल्या जबाबावरून फिरले. या प्रकरणात लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, भाजप नेत्या प्रज्ञा ठाकूर, मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त), अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांच्यावर बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंधक कायदा (यूएपीए) आणि भारतीय दंड संहिता (आयपीसी) अंतर्गत खटला सुरू आहे. या प्रकरणाचा तपास यापूर्वी महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) केला होता, परंतु २०११ मध्ये या प्रकरणाच्या तपासाची जबाबदारी राष्ट्रीय तपास संस्थेकडे (एनआयए) सोपवण्यात आली.

एनआयएने २०१६ मध्ये आरोपपत्र दाखल केले होते, ज्यामध्ये प्रज्ञा ठाकूर आणि इतर तीन आरोपी श्याम साहू, प्रवीण तकलकी आणि शिवनारायण कलसांगरा यांना क्लीन चिट देताना म्हटले होते की त्यांच्याविरुद्ध कोणताही पुरावा आढळला नाही आणि त्यांना या प्रकरणातून निर्दोष मुक्त केले जावे. तथापि, एनआयए न्यायालयाने साहू, कलसांगरा आणि तकलकी यांना निर्दोष सोडले आणि निकाल दिला की प्रज्ञा ठाकूर यांना खटल्याचा सामना करावा लागेल.

**सात आरोपींविरुद्ध निश्चित झाले होते आरोप**

विशेष न्यायालयाने ३० ऑक्टोबर २०१८ रोजी सात आरोपींविरुद्ध यूएपीए आणि आयपीसी अंतर्गत आरोप निश्चित केले होते. त्यांच्यावर यूएपीएच्या कलम १६ (दहशतवादी कृत्य) आणि १८ (दहशतवादी षड्यंत्र रचणे) आणि आयपीसीच्या कलम १२० (बी) (गुन्हेगारी षड्यंत्र), ३०२ (हत्या), ३०७ (हत्येचा प्रयत्न), ३२४ (दुखापत करणे) आणि १५३ (ए) (दोन धार्मिक गटांमध्ये शत्रूत्व वाढवणे) अंतर्गत खटला सुरू आहे. सरकारी पक्षाच्या साक्षीदारांची साक्ष नोंदवण्याचे काम गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये पूर्ण झाले होते.

## शेतीसाठी 'एआय'!

शैक्षणिक संसाधनांचीही माहिती देईल. या पची विस्तार या केंद्र सरकारच्या अद्ययावत आणि विद्यमान संरचनांशी सांगड घातली जाणार आहे.

व्यक्तिगत पातळीवर अधिक ज्ञान मिळविण्यासाठी कृत्रीम बुद्धिमत्ता, यांत्रिक शिक्षण तंत्रज्ञानाचा उपयोग केला जाईल. या पद्वारे केवळ पीक उत्पादनच नव्हे तर काढणी पश्चात प्रक्रियेसंदर्भातही माहिती दिली जाणार असल्याचे राज्य शासनाचे म्हणणे आहे. या पचा पहिला टप्पा मे महिन्यापर्यंत सुरू करण्यात येणार आहे. तर शिक्षण व्यवस्थापन प्रणालीचा टप्पा सप्टेंबर महिन्यापर्यंत सुरू करण्याची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

## रोजगार हमीवर उच्चांकी 'हजेरी'

मार्फत रोजगार हमी योजनेची अंमलबावणी करण्यात येते. या दोन्ही विभागाच्या वतीने सध्या जिल्ह्यात ४ हजार ६७७ ठिकाणी रोजगार हमीची कामे सुरू आहेत. यात जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाची ४ हजार ४७४ कामांचा समावेश असून महसूल यंत्रणेची अवघी २०३ कामांचा यात समावेश आहे. ग्रामीण भागातील अकुशल मजुरांना वर्षभरात किमान १०० दिवस रोजगार उपलब्ध व्हावा, या हेतूने केंद्र सरकारने कायदा करून महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरू केली. या योजनेतून प्रामुख्याने अकुशल मजुरांना रोजगार देणे हा हेतू असल्याने सुरुवातीला त्यातून केवळ मजुरांकडून होऊ शकतील अशीच कामे मंजूर केली जात होती. नंतर या कामांमधून मालमत्तानिर्मिती करण्याच्या हेतूने त्यात कुशल कामांचाही समावेश करण्यात आला आहे.

जिल्ह्यात पूर्वी रोहयोतून रस्ते आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य होते. मात्र, अलिकडच्या काही वर्षात कृषी आणि घरकुलांच्या विविध योजना यात समावेश करण्यात आला आहे. शेतकऱ्यांसाठी कांदा चाळ, पशूधनासाठी गोठेही या योजनेत बांधण्यात येत आहे. यासह सरकारने घरकुलाची उभारणी रोजगार हमीतून सुरू केल्याने जिल्ह्यात चालूवर्षी रोहयोवर मजूरांची संख्या वाढतांना दिसत आहे. शनिवारअखेर जिल्ह्यात रोहयोवर २८ हजारांपुढे मजूरांची उपस्थिती होती. पुढील आठवड्यात हा आकडा ३० हजारांचा टप्पा ओलांडणार असल्याचा अंदाज आहे.

**अशी आहे मजुरांची उपस्थिती**

जिल्ह्यात सध्या कर्जत तालुक्यात सर्वाधिक ७ हजार ७२२, त्याखालोखाल पाथर्डी ४ हजार ३९०, जामखेड ३ हजार ५५, अकोले २ हजार ५७७, शेवगाव २ हजार ३१२, पारनेर १ हजार ५८९, कोपरगाव १ हजार २८६, संगमनेर १ हजार १६७, नेवासा ९७४, श्रीगोंदा ८४७, नगर ८३७, राहाता ४४१, राहुरी ३९१ आणि श्रीरामपूर १५८ मजूरांची उपस्थिती आहे.

## वर्षभरापासून ९९ ग्रामपंचायतींना निवडणुकीची प्रतिक्षा

आहे.त्यानंतर निवडणूका जाहीर होण्याची अपेक्षा जिल्हा प्रशासनला आहे. गेल्या वर्षभरापासून नगर जिल्ह्यातील ९९ ग्रामपंचायतींसह १९७ ठिकाणी पोटनिवडणूका झालेल्या नाहीत. या ठिकाणी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार १९ मार्चला प्रभागनिहाय प्रारूप मतदार प्रसिध्द करण्यात. या प्रारूप मतदार यादीवर हरकती घेवून २७ मार्चला या ठिकाणी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. दरम्यान, नगरसह राज्यातील मुदत जिल्हा परिषद पंचायत समित्या आणि महानगरपालिका यांच्या निवडणुका रखडलेले आहेत. याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. मागील महिन्यांत राज्य सरकारने जातीच्या प्रवर्गानूसार लोकसंख्येची माहिती राज्य सरकारने घेतलेली आहे. त्यानंतर सरपंच पदाचे आरक्षण अंतिम करून ते २५ एप्रिलपर्यंत अंतिम करण्याचे आदेश दिलेले आहेत.

जिल्ह्यात गेल्या वर्षभरापासून अकोले ८ ग्रामपंचायती, संगमनेर २ ग्रामपंचायती, कोपरगाव ३ ग्रामपंचायती, राहाता १, श्रीरामपूरमधील २ ग्रामपंचायती, राहुरी तालुक्यातील ३ ग्रामपंचायती, नेवासा तालुक्यातील २६ ग्रामपंचायती, शेवगाव ६ ग्रामपंचायती, पाथर्डी ४ तालुक्यातील, जामखेड ३, श्रीगोंदा १, कर्जत ८, पारनेर १ ग्रामपंचायत आणि नगर तालुक्यातील ७ ग्रामपंचायती अशा ८४ ग्रामपंचायत आणि १५५ सदस्य यांचा समावेश आहे. तर २०२५ मध्ये मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीमध्ये श्रीगोंदा तालुक्यातील ६, संगमनेर २, कर्जत २, पारनेर २ आणि अकोले तालुक्यातील ३ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या ठिकाणी गाव कारभाऱ्यांना निवडणुकांची प्रतिक्षा आहे. सरपंच पदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर मुदत संपलेल्या या ग्रामपंचायतीसाठी निवडणूका होण्याची शक्यता जिल्हा प्रशासनला आहे.

## बँक लुटीचा प्रयत्न, आग...

कॅश चोरताना इलेक्ट्रिक कटरचा स्फोट होऊन बँकेला आग लागली. त्यामुळे चोरट्यांनी कार घटनास्थळी सोडून पळ काढला. मात्र, या आगीत बँकेतील ग्राहकांचे एटीएम कार्ड, चेकबुक, डीडी बुक , कर्ज फाईल, कॅश व्हाऊचर, संगणक, युपीएस, फर्निचर व दैनंदिन व्यवहाराचे कागदपत्रे असा जवळपास पंधरा लाख रुपयांचा ऐवज जळून खाक झाल्याचे बँक प्रशासनाने म्हंटले आहे.

बँकेतील ऑफिसर भाग्यश्री राठोड यांनी कळवल्यानंतर बँकेचे मॅनेजर बजरंगलाल ढाका, कॅशियर अमित वैद्य यांनी घटनास्थळी भेट दिली. तोपर्यंत उपविभागिय पोलीस अधिकरी भागवत फुंदे, पोलीस निरीक्षक शामसुंदर कौठाळे व पोलीस स्टाफ घटनास्थळी दाखल झाला होता. पोलिसांनी चोरांनी वापरलेली कार हस्तगत केली असून ही कारही चोरीचीच असल्याचे उघड झाले आहे. या कारमध्ये आणखी दोन डुप्लिकेट नंबर प्लेटसह टामे, कोयता व इलेक्ट्रिक कटर हे साहित्य आढळून आले आहे.

आग विझवण्यासाठी नगर परिषदेच्या अग्निशामन दलाला पाचारण करण्यात आले. सुल्तान साबेर खान, युवा सेनेचे जिल्हा समन्वयक आमिर आली, अहमद बिल्डर अब्दुल्ला चाऊश, अमजद अली, नवीद बिल्डर, अजीम अली पठाण, सोहन पालेजा, तालेब कुरेशी, मन्सूर अली, आवेज पठाण, साकीब कुरेशी, मुजीब हाफीज शेख, कलीम बिल्डर, प्रशांत कंगले, नंदू मुगदिया, सलीम शेख, सिनू राजपूत यांनी जिवाची पर्वा न करता पाईपच्या सहाय्याने आग विझवली. सकाळी सहा वाजेपर्यंत अग्नीचा तांडव सुरू होता. पोलिसांनी चोरट्यांचा माग काढण्यासाठी श्वानपथकाला पाचारण केले होते. तसेच घटनास्थळी न्यायवैद्यक (फॉरेन्सीक) पथकही हजर झाले होते. आरोपींना लवकरच पकडले जाईल, अशी माहिती पोलीस निरीक्षक शामसुंदर कौठाळे यांनी माध्यमांना दिली. दरम्यान याप्रकरणी बँकेचे मॅनेजर श्री.ढाका यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## तूर डाळीची किंमत कमी होणार

करण्यात आली आहे.

**२७ लाख टन हरभरा खरेदीला मंजुरी**

सरकारने तेलंगणा आणि मध्य प्रदेशातून १७,००० टन हरभरा खरेदी केला आहे. २७ लाख टन हरभरा खरेदीला मंजुरी मिळाल्यावरही खरेदी संथपणे सुरू आहे, कारण १० टक्के आयात मूलभूत शुल्क लागू केल्यानंतर देशांतर्गत किमती ५,६५० रुपये प्रति क्विंटलच्या MSP पेक्षा जास्त झाल्या आहेत. १३ एप्रिलपर्यंत मसूरची खरेदी २८,७०० टन आणि मूगाची खरेदी ३,००० टनांवर पोहोचली आहे. जेव्हा काही शेतमालाच्या बाजारातील किमती एमएसपी च्या खाली येतात, तेव्हा किंमत समर्थन योजना लागू केली जाते.

**केंद्रीय संस्था करणार डाळ खरेदी**

२०२४-२५ च्या अर्थसंकल्पात सरकारने २०२८-२९ पर्यंत राज्यात तूर, मसूर आणि उडीद डाळींच्या उत्पादनात स्वयंपूर्णता मिळवण्यासाठी एक योजना निश्चित केली आहे. यानुसार, केंद्रीय संस्था डाळ खरेदी करतील. अलिकडच्या वर्षांत देशांतर्गत उत्पादनात वाढ झाली असली तरी, देशांतर्गत डाळींच्या पुरवठ्यातील कमतरता भरून काढण्यासाठी भारत अजूनही आयातीवर अवलंबून आहे.